(१०४)

जा.क्र.: कक्ष-६/जमीन/ ३० /१०-११
वनसंरक्षक, पुणे वन विभाग, पुणे
सेनापती बापट मार्ग, पुणे : ०४
दिनांक : ०६ /०४/२०१०

पत्र -

प्रति,

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),
पुणे

**विषय :** तत्कालीन उपवनसंरक्षक, पुणे श्री. राजेंद्र मंगरुळकर, यांच्या मदतीने श्रीमती. मधू कपूर यांनी राखीव वनाच्या करत असलेल्या विक्रीबाबत तक्रार.

**संदर्भ :** १) आपले कडील ज्ञापन क्र. कक्ष-१/जमीन/प्रक्र/१३०/३८१५, दि. १६.०१.२०१०.
२) आपले कडील अ.शा.पत्र क्र.कक्ष-१/जमीन/प्रक्र/१३०/२७४, दि.१८.०१.२०१०.
३) आपले कडील अ.शा.पत्र क्र.कक्ष-१/जमीन/प्रक्र/१३०/३०५, दि.१०.०२.२०१०.

कृपया संदर्भांकित क्रमांकाचे अवलोकन होणेस विनंती.

संदर्भांकित पत्रासोबत जोडलेल्या सहपत्रानुसार वस्तुस्थितीदर्शक अहवाल खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

**मुद्दा क्र. १ व २ -** श्रीमती. राधीका चेतन मेहरा व मधू प्रकाश कपूर यानी दिनांक १६.०९.२००० रोजी वनपरिक्षेत्र अधिकारी, शिरोता यांचेकडे मालकी स.नं. ४ (गट नं.१५) व मालकी स.नं. ३ (गट नं. १३) मध्ये राहण्यासाठी बंगला बांधणार असल्याने सदर क्षेत्रावर झाडे लावलेबद्दलचे प्रमाणपत्र मिळणेस विनंती केली होती. वनपरिक्षेत्र अधिकारी, शिरोता यांनी चौकशी करुन अनुक्रमे त्यांचेकडील पत्र क्र.अ/आस्था/४५८ दि.१/११/२००० व ४५९ दि,१/११/२०००(**परिशिष्ट १ पान क्र.१ ते १७**) अन्वये अहवाल या कार्यालयास सादर करण्यात आला. वनपरिक्षेत्र अधिकारी, शिरोता यांचे अहवालानुसार तत्कालीन उपवनसंरक्षक, पुणे श्री.राजेंद्र मंगरुळकर यांनी संबंधीतांना अस्तित्वात असलेल्या वृक्षांबाबत अर्जदार यांनी मागणी केलेनुसार त्यांना मौजे पांगळोली गट नं. १५ क्षेत्र १.५५ हे. व गट नं. १३ क्षेत्र ०.७७ हे. क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या वृक्षांबाबत पत्र या कार्यालयाचे अनुक्रमे पत्र क्र.ब/कक्ष-३/जमिन/२०८३ दि.०४/१२/२००० व २०८२ दि.०४/१२/२००० (**परिशिष्ट २ पान क्र. १८, १९**) अन्वये देण्यात आलेचे दिसुन येत आहे. त्यावेळी अर्जासोबत जोडलेल्या ७/१२ अभिलेख्यात इतर हक्कात महाराष्ट्र खाजगी वन (संपादन) अधिनियम १९७५ अंतर्गत संपादित अशी नोंद महसूल विभागाने घेतल्याचे दिसुन येत नाही.

२. सद्यःस्थितीत या कार्यालयात उपलब्ध असलेले अभिलेखे पहाता मौजे पांगळोली येथील गट क्र. १३,१४ व १५ जुना स.नं. नोटीसीप्रमाणे अनुक्रमे ६१, ६० व ५९ नकाशावरुन समजण्यात आल्याचे दिसुन येते. गट नं. १३ व १५ संबंधी कागदपत्राची खात्री केली असता त्यास अनुक्रमे जुना स.नं.६१ व ५९ संबंधी भारतीय वन अधिनियम १९२७ कलम ३५ (३) नुसार नोटीसा संबंधित मालकांना सन १९५६ मध्ये बजावल्याचे दिसुन येते. नोटीसा बजावल्यानंतर तत्कालिन विभागीय वन अधिकारी, पुणे यांनी तत्कालिन वनसंरक्षक, पुणे (Central Circle) यांना सादर केलेल्या मासिक अहवालात तसे नमुद केलेले आहे. सदरच्या नोटीसीनंतर दि.२८/२/१९७६ रोजी महाराष्ट्र खाजगी वन (संपादन) अधिनियम १९७५ चे कलम ३(१) चे नोटीसीप्रमाणे दि. ३०/८/७५ रोजी सदर क्षेत्राचे मालक अनुक्रमे प्रभाकर पुरुषोत्तम डहाणुकर व खंडू भिमा अंभोरे हे होते. ताबा घेतांना प्रत्यक्ष मुळमालकाकडून ताबा घेतल्याचे निर्दशनास येत नाही तसेच या कार्यालयाचे पत्र क्र. ब/मालकी/३२५२ दि.३०/८/७६ जिल्हाधिकारी, पुणे यांना महाराष्ट्र खाजगी वन (संपादन)

माहिती अधिकारी
तथा
मुख्य लेखापाल,
पुणे वन विभाग, पुणे.

(१४३)

अधिनियम १९७५ अंतर्गत संपादित झालेल्या क्षेत्राची दिलेल्या माहितीत सदर स.नं. ६१,५९ असल्याचे दिसुन येत आहे. **(परिशिष्ट ३ पान नं.२० ते ४४)**

अर्जदार यांनी मागीतलेल्या प्रमाणपत्राच्या अनुषंगाने या कार्यालयाने दिलेल्या पत्राबाबत दिलेल्या कार्यालयीन टिप्पणी चे अवलोकन करता उपरोक्त परिच्छेद२ (परिशिष्ट ३) मध्ये नमुद केलेल्या दस्तऐवजामध्ये स.नं.५९,६१ नमुद केले होते. परंतु त्याचे गट नं.१३ व १५ मध्ये रुपांतराची माहिती नमुद करण्यात आलेली नव्हती. तसेच सदरची माहिती महसूल विभागाकडून प्राप्त झाली नसल्याने सदरील गट नं.१३ व १५ हे मालकी गट समजून त्याप्रमाणे संबंधितांना तसे कळविल्याचे दिसुन येते. **(परिशिष्ट ४ पान नं.४५,४६)**

प्रकरणी सदर क्षेत्र खाजगी वनात येत असल्याने वनपाल कार्ला (वनपरिक्षेत्र शिरोता) यांनी प्रथम गुन्हा रिपोर्ट क्र.४ दि. १२/९/२००३ रोजी भारतीस वन अधिनियम १९२७ कलम २६ नुसार गुन्हा नोदविला. तसेच सहा.वनसंरक्षक पूणे यांनी महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ५३,५४ नुसार नोटिस देवुन त्याबाबत सुनावणी घेऊन त्यांचे कडील पत्र क्र. ब/कक्ष-३/सवंस/४० दि. १०/६/२००४ अन्वये श्रीमती मधु प्रकाश कपुर यांना आदेश पारित केले. **(परिशिष्ट ५ पान नं. ४७,४७अ, ते ४९)**

या संदर्भात स.नं.६० हा दि.२९/१२/१९२१ चे गॅझेटनुसार राखीव वन आहे. व त्याचे क्षेत्र १४ एकर २१ गुंठे होते सन १९५७-५८ मध्ये ट्रॅंग्युलेशन झाल्यामुळे क्षेत्रात व हद्दीत बदल होऊन नवीन नकाशा तयार झाला त्याला राखीव वन स.नं. ५ असा देण्यात आला व त्याचे क्षेत्र १३ एकर १९ गुंठे होते. तद्‌नंतर सदर क्षेत्रास गटवारीनुसार गट क्र.१४ देण्यात आला त्याचे क्षेत्र ७/१२ उता-यावर ५.४५ हे. असे आहे. **(परिशिष्ट ६ पान नं.५० ते ५५)**

पुणे वन विभागातील महाराष्ट्र खाजगी वन (संपादन) अधिनियम १९७५ अंतर्गत संपादीत झालेल्या क्षेत्राबाबतची नोंदी घेणेबाबत वन विभागाने वारंवार कळविल्यानंतरही महसूल विभागाकडून नोंदी घेण्यात आलेल्या नव्हत्या. तथापि, रिट याचिका क्र. २९८०/२००१ रुपांतरित जनहित याचिका क्र. १७/२००२ मुंबई पर्यावरण कृती समिती व इतर विरुध्द् महाराष्ट्र शासन बाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या निर्देशानुसार सन २००५ पासून नोंदी घेण्याचे काम सुरु करण्यात आलेले आहे. तद्‌नंतर सदर गट नं. १३ व १५ चे ७/१२ अभिलेखात दि.०८/१०/२००८ रोजी महाराष्ट्र खाजगी वन संपादन अशी नोंद घेतल्याचे दिसून येत आहे. सोबत ७/१२ अभिलेख्याची छायांकित प्रत अवलोकनार्थ सादर केली आहे. **(परिशिष्ट ७ पान क्र.५६,५७)**

मौजे पांगळोली येथील स.नं.५५, ५६, ५७, ५३, ५८, **५९, ६१,** ६४, ६५ हे खाजगी वनाचे यादीत असल्याचे निर्देशनास आल्याने सदर स.नं. नुसार संबंधित खातेदार यांना १९५६-५७ मध्ये नोटीसा दिलेल्या असुन सदरच्या नोटीसीनंतर महाराष्ट्र खाजगी वन (संपादन) अधिनियम १९७५ चे कलम ३(१) चे नोटीसीप्रमाणे क्षेत्राचा ताबा दि.०८/१२/१९७५ रोजी वरील स.नं. प्रमाणे ताबा घेतल्याचे दिसुन येत आहे. **(परिशिष्ट ७अ - पान क्र.५७अ,ब,क,ड)**

दरम्यानच्या कालावधीमध्ये मुळ नकाशा व सन १९५८ ला तयार करण्यात आलेला नकाशा यांच्यात ताळमेळ घातला असता सर्व्हे नं ६० च्या हद्दी या नविन नकाशाप्रमाणे अंदाजे ३५ ते ४० मीटर उत्तरेकडे स्थानांतरित झाल्याने वनपरिक्षेत्र अधिकारी शिरोता यांनी त्यांचे दिनाक ०९/०६/२००५ च्या पत्रान्वये या कार्यालयास अहवाल सादर केला वनक्षेत्राच्या हद्दीत झालेल्या बदलामुळे या कार्यालयाकडुन आयुक्त जमाबंदी कार्यालय पुणे यांना या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-३/जमीन/१२०५ दि. १५/७/२००५ **(परिशिष्ट ८ पान नं. ५८ ते ६१)** अन्वये स्वंस्पष्ट लिहुन नकाशाबद्दल झालेली संदिग्धता दुर करण्याची विनंती केली. व सदर पत्राची प्रत आपले कार्यालयास देण्यात आलेली आहे. या संदर्भात मुख्य वनसंरक्षक (संधारण ) यांनी त्यांचे दि. २२/७/२००५ चे पत्रान्वये मुख्य वनसंरक्षक (प्रा) पुणे यांना प्रश्नांकित क्षेत्राच्या हद्दीबाबत निर्णय प्राप्त करुन घ्यावा व त्यानुसार अतिक्रमणाबाबत सविस्तर वस्तुस्थितीबाबत अहवाल सादर करावा. व सदर पत्राची प्रत



माहिती अधिकारी
तथा
मुख्य लेखापाल,
पुणे वन विभाग, पुणे.

(१०२)

उपसंचालक भुमिअभिलेखे (वने) म.रा. नागपुर यांना व या कार्यालयास पृष्ठांकित केलेल्या होत्या त्यानुसार उपसंचालक भुमिअभिलेख (वने) म.रा. नागपुर यांनी त्यांचे दिनांक २४/०८/२००५ चे पत्रान्वये तालुका भुमिअभिलेख वडगाव मावळ यांना पत्र देवुन नकाशे उपलब्ध करुन देण्याची विनंती केली तसेच अधिक्षक भुमिअभिलेख पुणे यांनी तालुका निरीक्षक भुमिअभिलेख वडगाव मावळ यांना नकाशा संबंधी खात्री करण्यास कळविले. **(परिशिष्ट ९ पान नं.६२.६३)**

दरम्यानच्या कालावधीत उपसंचालक भुमि अभिलेखकक्ष पनवेल यांनी २००६ मध्ये तालुका भुमिअभिलेख कार्यालयात येवुन समक्ष खात्री केली त्याप्रमाणे गट क्र. १४ चे क्षेत्राचे मोजणीसाठी तालुका भुमिनिरीक्षक अभिलेख यांना अर्ज करुन मोजणी करावी असे निश्चीत झाले. तद्पुर्वी वनपरिक्षेत्र अधिकारी शिरोता यांनी त्यांचे दि, १०/०६/२००५ चे पत्रान्वये संबंधितांना कळवुन नविन नकाशाप्रमाणे गट क्र. १४ मधील बांधकाम थांबविण्याविषयी संबंधितांना लेखी सुचना दिल्या. दरम्यान श्रीमती मधु कपुर यांनी मा. मंत्री (वने) म.रा. मुंबई यांचेकडे प्रकरणी ट्रॅग्युलेशन पद्धतीने सर्व्हे केला असता नविन नकाशा प्रमाणे काही बांधकाम राखीव वन गट क्र. १४ मध्ये येत असल्याचे कळविले व शासनाकडुन वनसंवर्धन अधिनियम १९८० त्या अनुषंगाने आवश्यक ते निर्देश देण्याची विनंती केली त्यानुसार सहसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील दिनांक २८.०९.२००५ चे पत्रान्वये खात्री करुन केंद्र शासनाच्या मंजूरीसाठी प्रस्ताव उचित मार्गाने सादर करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर मुख्य वनसंरक्षक (प्रा.), पुणे यांचेकडील ज्ञापन क्र. कक्ष-१/जमीन/३१४५, दिनांक २८.१२.२००५ अन्वये शासन पत्रात दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करणेबाबत या कार्यालयास कळविले. त्यानुसार प्रस्ताव मुख्य वनसंरक्षक (प्रा.), पुणे यांचे कार्यालयामार्फत मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांना सादर करण्यात आलेला आहे.**(परिशिष्ट १० पान नं.६४ ते ६८)**

१) तद्नंतर संबंधितांनी मौजे पांगळोली गट नं. १३ व १५ चे क्षेत्र (महाराष्ट्र खाजगी वन (संपादन) अधिनियम १९७५ अंतर्गत संपादित झालेले असल्याने सदर क्षेत्र उपविभागिय अधिकारी, मावळ यांचेकडून पुनःस्थापित करुन घेतले व त्याबाबतचा वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत प्रस्ताव सादर केला आहे.

२) मौजे पांगळोली ता.मावळ येथील राखीव वनक्षेत्र स.नं. १४ मध्ये ०.९९ हे.क्षेत्र हॉलीडे रिसॉर्ट तसेच अंतर्गत रस्ते इ.साठी वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गतचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

उपरोक्त १ बाबत मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांनी त्यांचेकडील पत्र क्र. कक्ष-१७/नोसेल/२/(१२)/२००६, दिनांक २०.११.२००८ अन्वये सदर प्रस्तावाबाबत काही आरोप असल्यामुळे विधी व न्याय विभागाचे मत घेण्याकरीता शासनास कळविण्यात आले आहे. शासनाकडून अभिप्राय प्राप्त झालेनंतरच सदर प्रकरणी पुढील संस्करण करण्यात येईल असे कळविण्यात आले आहे.

उपरोक्त २ बाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक, म.रा. नागपूर यांचेकडील दिनांक ०६.०५.२००८ चे पत्रान्वये मौजे पांगळोली, ता. मावळ, जिल्हा पुणे येथे झालेल्या अतिक्रमणाचे संदर्भात आरोपीच्या विरुध्द् विनाविलंब कार्यवाही करणे व अतिक्रमण हटविणेबाबत मुख्य वनसंरक्षक (प्रा.), पुणे यांना निर्देश देण्यात येऊन प्रत या कार्यालयास पृष्ठांकित करण्यात आलेले आहे. **(परिशिष्ट ११ पान नं. ६९ ते ७१, ७१अ)** प्रकरणी वनक्षेत्रात अतिक्रमण केल्यासंबंधी गुन्हा दाखल करुन वन अपराध प्रथम प्रतिवृत्त नं.अतिक्रमण १/सन २००८-०९ दि .२०/५/०८ अन्वये गुन्हा दाखल करुन गुन्ह्याची माहिती प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांना कळविण्यात आली,दरम्यानचे काळात श्रीमती मधु कपुर यांनी वरिष्ठ दिवाणी न्यायालय, पुणे येथे दिवाणी दावा क्र. ८०१/२००८ दाखल केला त्याप्रमाणे त्यांना दिवाणी न्यायालयाने अतिक्रमण दुर करण्यासंबंधी स्थगिती दिली. ( **परिशिष्ट १२ पान नं. ७२, ७३**) तसेच संबंधीतांनी सिव्हील जज्ज, सिनियर डिव्हीजन, पुणे यांचेकडील मनाई आदेशही प्राप्त करुन घेण्यात आलेला आहे. सदर दाव्याचा निकाल शासनाचे बाजूने दिला. ( **परिशिष्ट १३ पान नं. ७४ ते ९१**) प्रकरणी संबंधीतांनी जिल्हा न्यायालय पुणे यांचेकडे सिव्हील अपिल क्र. २९५/२००८ असा अर्ज दाखल केला. त्याचाही निकाल दिनांक २९.१२.२००८ ( **परिशिष्ट १४ पान नं. ९२ ते १०४**) रोजी वन विभागाचे बाजूने लागला आहे. या संदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे तक्रारदार जाणेची शक्यता असल्याने वनविभागाकडून मा. उच्च न्यायालयात कॅव्हेट क्रमांक ३४/२००९ दाखल करण्यात आले. ( **परिशिष्ट १५ पान नं. १०५ ते १०७** )



माहिती अधिकारी
तथा
मुख्य लेखापाल,
पुणे वन विभाग, पुणे.

(१४१)

र्क. ३ प्रकरणी अर्जदार यांनी मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. ४४/२००९ दाखल केली. या संदर्भात शासनाच्या वतीने सहसचिव, (वने) महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांनी म्हणणे दाखल केले होते. या संदर्भात दिनांक १०.०२.२००९ रोजी सुनावणीच्या वेळी ॲडव्होकेट जनरल, श्री.कदम हे स्वतः हजर होते त्यांनी वनविभागाची बाजू मांडली (त्याची प्रत सोबत जोडली आहे) तसेच अर्जदार यांना मा. न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार सर्वोच्च न्यायालयात (परिशिष्ट १६ पान नं./) १०८,१०९ महाराष्ट्र खाजगी वन (संपादन) अधिनियम १९७५ अंतर्गत शासनाच्या वतीने सुरु असलेल्या प्रकरणात अर्जदार हे सामील झाले. त्यानुसार अर्जदार यांनी - एस.एल.पी.सिव्हील क्र.११६४०/२००८ मधे Application No.3 दाखल केले याबाबत न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार प्रकरणी सी.ई.सी. च्या (Recommendation) अहवालाप्रमाणे (वर्गवारीप्रमाणे) माहिती तयार करुन मुख्य वनसंरक्षक(प्रा.) पुणे यांना सादर केलेली आहे. सदर प्रकरण सर्वोच्च न्यायालयात सुनावणीवर प्रलंबित आहे. तसेच राखीव वन क्षं.न.१४ बाबत मुख्य वनसंरक्षक,(संधारण) म.रा.नागपूर यांनी त्यांचेकडील पत्र क्र.कक्ष-१२/जमीन/३/पुणे/प्रक्र/२/०८-०९/भाग-२/६५ दि.०६/०५/२००९ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही मोजणीचे काम सुरु आहे मोजणीबाबत अहवाल प्राप्त होताच सादर करण्याची तजवीज ठेवली आहे.

उपरोक्त नमुद प्रमाणे या कार्यालयात उपलब्ध असलेल्या अभिलेख्यानुसार स.न.१३ व १५ बाबत सद्यःस्थिती निर्देशनास येत आहे.

मुद्दा क्र. २ - प्रधान मुख्य वनसंरक्षक, म. रा.नागपूर यांचेकडील पत्र क्र. कक्ष-१२/जमीन/३/पुणे/प्रक्र/७/०८-०९/३८०/०८-०९ दि.२८/७/२००८ अन्वये सर्वोच्च न्यायालयाचे सी.ई.सी.कडील पत्र क्र.२-४२/सीईसी/एससी/२००८ दि.२५/०७/०८ ची प्रत या कार्यालयास प्राप्त झाली. **(परिशिष्ट १७ पान क्र.** ११० , १११ **)** सदर पत्रात

**Construction of two star holiday resort number of bunglow servants labour quarters swimming pool etc. by Mrs. Madhu Prakash Kapoor and Ms.Radhika Chetan Kapoor in reserved forest S.No.60 (gut no.14) and acquired reserved forest survey No.59 and 61 (Gut No.13 and 15) of Pangloli village Maval Tahsil of Pune .**

असे नमुद करण्यात आल्याने या संदर्भात अहवाल या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-३/जमीन/११२८ दि. २१/११/०८ अन्वये आवश्यक त्या सहपत्रासह आपले कार्यालयास सादर करण्यात आलेला आहे कृपया त्याचे अवलोकन होणेस विनंती.

सी.ई.सी.ने दिलेल्या मुद्यात उपरोक्त नमुद मुद्दा १ व २ मध्ये नमुद करण्यात आलेल्या पत्रासंबंधी काहीही उहापोह नसल्याने सदर सहपत्राची प्रत देण्यात आलेली नाही.

मुद्दा क्र. ३ - सदर प्रकरण सी.ई.सी. कडे दाखल झाल्याने याबाबतचा अहवाल या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-३/जमीन/११२८ दि. २१/११/०८ अन्वये आपले कार्यालयास सादर करण्यात आलेला आहे कृपया त्याचे अवलोकन होणेस विनंती.

मुद्दा क्र. ४ - याबाबत कृपया आपले स्तरावर कार्यवाही होणेस विनंती.

वनसंरक्षक,
पुणे वनविभाग, पुणे

माहिती अधिकारी
तथा
मुख्य लेखापाल,
पुणे वन विभाग, पुणे.